# प्रकरण - दुसरे

## मूल्य शिक्षण

### अर्थ, व्याख्या, संकल्पना, उद्दिष्टे,

### आवश्यकता

# प्रकरण - दुसरे

## मूल्यशिक्षण


२.१ मूल्यशिक्षण - अर्थ आणि व्याख्या

२.२ मूल्यशिक्षण - संकल्पना

२.३ मूल्यशिक्षणाची व्याप्ती

२.४ मूल्यशिक्षणाची उद्दिष्टे

२.५ मूल्यशिक्षणाची आवश्यकता

२.६ मूल्यशिक्षण आणि माध्यमिक शाळा

२.७ मूल्यशिक्षणाची आव्हाने व प्रचलित शालेय अभ्यासक्रम

२.८ मूल्यशिक्षण आणि पाठ्यपुस्तके

२.९ शासनाने मूल्यशिक्षण विषयात समावेश केलेली मूल्ये

२.१० शासनाने निर्धारित केलेल्या मूल्यांची संकल्पना

२.११ मूल्यशिक्षणाची तासिक व तिचे नियोजन

२.१२ मूल्यशिक्षण - मासिक नियोजनाचा नमुना

२.१३ मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका

# प्रकरण - दुसरे

## मु ल्य शि क्ष ण

### २.१ मुल्यशिक्षण : अर्थ आणि व्याख्या

मुल्य म्हणजे MORAL शिक्षण म्हणजेच EDUCATION. लॅटिन भाषेतील MORUS या शब्दावरुन MORALITY हा शब्द आला. सामाजिक रीतिरिवाज पद्धती किंवा समुहाचे सिध्दान्त असा MORALITY या शब्दकोशात अर्थ दिला आहे. सामाजिक नियमांशी सुसंबध्द वर्तन म्हणजे नैतिकता होय. नेहमीची वर्तणूक म्हणजेच "मुल्ये" अशी मुल्याची कार्यात्मक व्याख्या सांगितली जाते. नीतीचा सदाचार किंवा योग्य आचार असाही मुल्यशिक्षणाचा अर्थ सांगितला जातो. आचारविषयक नियमांचे पालन करुन वागणे म्हणजे नीतीने वागणे होय. "ज्यासाठी मनुष्य जगतो अशी कल्पना म्हणजे मुल्य" अशी मुल्याची व्याख्या ओयवे यांनी केली आहे. माणसाचे वर्तन कसे असावे याचे आदर्श समाजाने निर्माण केलेले असतात हे आदर्श म्हणजेच मुल्य.

थोडक्यात मुल्यशिक्षण हा शिक्षणाचा मूळ स्त्रोत आहे. भारताने सांभाळलेल्या परंपरा आणि वारसा जतन करण्याचे सामर्थ्य मुल्य शिक्षणात सामावले आहे एवढे या संदर्भात ठामपणे सांगता येईल.

मुल्यशिक्षणाची व्याख्या शिक्षण संक्रमण या नियतकालिकातून पुढीलप्रमाणे दिलेली आहे. - " लोकशाही मुल्यांचे रक्षण सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समतेचे संवर्धन, सर्व धर्मांच्या सांस्कृतिक परंपरेतून आलेल्या मंगलमुल्यांचा स्वीकार व प्रत्येक धर्मातील अनिष्ट गोष्टींना पायाभूत असणारी

तात्त्विक भूमिका विद्यार्थ्यांना समजाऊन सांगणे व शिक्षणाच्या क्षेत्रात आणि समाज जीवनात या तत्त्वांच्या पालनासाठी त्यांना कटिबद्द करणे म्हणजेच खरे मूल्यशिक्षण होय." [१]

२.२ संकल्पना

"मूल्यशिक्षण ही संकल्पना आधुनिक असली तरी या संज्ञेला आज अभिप्रेत असलेल्या नैतिक मूल्यांच्या शिक्षणाची कल्पना शिक्षण क्षेत्राला नवीन नाही. वैदिक काळातील आश्रम शिक्षण पद्धतीपासून तर स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शिक्षण पद्धतीत उच्च दर्जाच्या जीवनमूल्यांचा व नैतिकमूल्यांचा भरभक्कम आधार आहे हे मान्य करावे लागेल. सर्व देशात व सर्व काळात शिक्षणाच्या उद्दिष्टात चारित्र्य संवर्धन आणि उच्च दर्जाची नैतिक मूल्ये प्रस्थापित करणे हे उद्दिष्ट मान्य करण्यात आले आहे.

प्रश्न असा निर्माण होतो की मूल्य शिक्षण, मूल्याधिष्ठित शिक्षण किंवा मूल्यनिर्धारित शिक्षण या संज्ञेला नैतिक शिक्षणाच्या संकल्पनेव्यतिरिक्त आणखी काय नवीन अभिप्रेत आहे. मूल्यशिक्षण म्हणजे शिक्षणाचा मूळ आधार होय. मूल्य शिक्षणाची संकल्पना ही नैतिक शिक्षणाच्या संकल्पनेपेक्षा अधिक व्यापक आहे. नैतिक शिक्षणाची आणि धार्मिक शिक्षणाची आवश्यकता अनेक शिक्षणतज्ज्ञांनी प्रतिपादन केले आहे." [२]

---

१. म.ज.जाधव.[संपादक]. "शिक्षण संक्रमण" [मार्च १९९७], महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, पृष्ठ,क्रमांक ३.

२. प्रा.ना.ग.पवार. "भारतीय शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह" नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती १९९१, पृष्ठ क्रमांक १२७.

## वर्धा शिक्षण आयोग [१९३७]

महात्मा गांधीच्या मार्गदर्शनानुसार झालेल्या १९३७ मध्ये वर्धा शिक्षण परिषदेने मूलभूत शिक्षण पद्धतीची तत्त्वे निश्चित केली. या परिषदेने नैतिक व धार्मिक शिक्षणाचे स्वरूप स्पष्ट केले. सर्व धर्मातील समान तत्त्वे, मूलभूत मूल्ये शोधून काढून त्यांचे शिक्षणातून संवर्धन व्हावे असे ठरविण्यात आले. सत्य आणि न्याय यासारख्या मूल्यांची जोपासना शिक्षणातून व्हावी यावर भर देण्यात आला.

## विद्यापीठ शिक्षण आयोग [१९४८-४९]

भारत स्वतंत्र झाल्यानंतर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठ शिक्षण आयोगाने नैतिक व धार्मिक शिक्षणाचा पुनर्विचार केला. शुभप्रवृत्ती आणि शुभभावनांचा परिपोष होण्याच्या दृष्टीने संकुचित धार्मिक शिक्षणाऐवजी व्यक्तिमत्त्व विकासास आवश्यक वाटणाऱ्या नैतिक व अध्यात्मिक शिक्षणावर भर देण्यात आला.

## माध्यमिक शिक्षण आयोग [१९५२-५३]

डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक शिक्षण आयोगाने नैतिक व अध्यात्मिक संस्कार यांवर भर दिला तसेच व्यक्ती व समाज यांच्या निकोप विकासासाठी सुयोग्य नैतिक संस्कार शिक्षणाच्या माध्यमातून घडावेत असे विचार आग्रहपूर्वक मांडले.

## धार्मिक व नैतिक शिक्षणाविषयक समिती [१९५९]

धार्मिक आणि नैतिक शिक्षणविषयक सखोल आणि व्यापक विचार श्रीप्रकाश यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त केलेल्या धार्मिक व नैतिक शिक्षणविषयक समितीने केलेला दिसून येतो. आपल्या अहवालात या समितीने नैतिक मूल्य

आणि अध्यात्मिक मूल्य यांच्या व्याख्या केल्या आहेत. इतरांशी योग्य रितीने वर्तन करण्यास जे मदत करते ते नैतिक मूल्य आणि इतरांकरिता किंवा श्रेष्ठ व उदात्त कारणांकरिता कल्याण बुद्धिने व स्वार्थरहित वृत्तीने जे त्यागाची प्रेरणा देते ते अध्यात्मिक मूल्य होय. विविध धर्मातील व्यापक आणि मूलभूत स्वरूपाच्या नैतिक व आध्यात्मिक मूल्यांना विशेष महत्त्व दिले आहे. विद्यापीठ आयोगाने जे विचार मांडले त्याचा पुनरुच्चार या समितीने केला आहे.

## भावात्मक एकात्मता समिती [१९६१]

देशातील विविध धर्मातील तत्त्वांचे आकलन व्हावे व परस्परांमध्ये सामंजस्य निर्माण व्हावे अशा प्रकारच्या कार्यक्रमावर भर द्यावा असे सूचित करणारी भावात्मक एकात्मता समिती डॉ. संपूर्णानंद यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली. राष्ट्रीय एकता आणि मानवकल्याण दृष्टीसमोर ठेवून अभ्यासक्रमाची रचना करावी असे या समितीने सुचविले आहे.

## भारतीय शिक्षण आयोग [१९६४--६६]

आधुनिकीकरण म्हणजे नैतिक, अध्यात्मिक व आत्मसंयमाचे महत्त्व नाकारणे नव्हे असा स्पष्ट इशारा डॉ. कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापित झालेल्या शिक्षण आयोगाने दिला. अनेक धर्मीय लोकशाही राज्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता आहे असे आयोगाने म्हटले आहे.

नैतिक शिक्षण देण्यासाठी आयोगाने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धती सुचविल्या आहेत. प्रत्यक्ष प्रकारात नैतिक आध्यात्मिक मूल्यशिक्षणासाठी दोन दोन तासिका वेळापत्रकात असाव्यात. अप्रत्यक्ष प्रकारात सभोवतालचे वातावरण

मूल्य स्वीकारण्यास पोषक असावे. सर्व शिक्षकांनी स्वतःच मूल्यशिक्षणाची जबाबदारी स्वीकारावी. शिक्षकांनी आपल्या वागणुकीतून मूल्ये विद्यार्थ्यात रुजवावीत असे आयोगाने मूल्यशिक्षणाच्या संदर्भात नमूद केले आहे.

शिक्षण विषयक राष्ट्रीय धोरण [ १९६७ ]

इ. स. १९६७ साली संसदीय सभासदांची एक समिती नियुक्त केली होती. या समितीने मानवता आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक मूल्य संवर्धन तसेच चारित्र्य निर्मितीसाठी शिक्षणाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले." [३]

एज्युकेशन फॉर अवर पिपल [ १९७८-८७ ]

श्री तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या या समितीने पुढील दहा वर्षांसाठी शिक्षण विषयक धोरण या विषयीचा अहवाल सादर केला, त्यात चारित्र्यसंवर्धन, वैज्ञानिक दृष्टीकोन, सांस्कृतिक मूल्यसंवर्धन यावर भर दिला आहे. लोकसमूहाच्या सांस्कृतिक मूल्यांचा परिचय शिक्षणातूनच घडावा अशी भूमिका या समितीने विशद केली आहे. एन्. सी. आर. टी. ई. या संस्थेनेही भारतीय राज्यघटना, भारतीय राज्यपद्धतीची गुणवैशिष्टये ध्यानात घेऊन शिक्षणविषयक अभ्यासक्रमातून नैतिक मूल्यांचे संस्कार घडावेत असे म्हटले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण [ १९८६ ]

स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्या कारकीर्दीत हे नवे धोरण जाहीर केले. यात शिक्षणाचा आशय व शैक्षणिक प्रक्रिया यांचा पुनर्विचार करताना मूल्यशिक्षणाची कल्पना विस्ताराने सांगितली आहे. विद्यार्थ्यांच्या नैतिक व

---

३. सुरेश करंदीकर. "मूल्यशिक्षण" फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र. ११

भावनिक विकासावर भार भर दिला आहे. मूल्यांच्या ऱ्हासाबद्दल वाढती चिंता तसेच मूल्यांचा होणारा उपहास यामुळे सामाजिक व नैतिक मूल्ये रुजविण्यात शिक्षण समर्थ साधन बनावे यासाठी अभ्यासक्रमाची पुर्नरचना करण्याची गरज प्रतिपादली आहे. भारतीय समाजात ऐक्य व पूर्णत्व निर्माण होण्यासाठी शिक्षणाने शाश्वत व वैश्विक मूल्यांना उत्तेजन दयावे तसेच धर्मवेड, हिंसा, दैववाद, लोकभ्रम या गोष्टी मूल्यशिक्षणाच्या माध्यमातून कमी करण्यात याव्यात असे नमूद केले आहे." ४

सखेन एस आणि वेंडिन्यु [१९८१] यांनी भविष्यसन्मुख शिक्षणातील सर्वसामान्य अभ्यासक्रमाचे स्वरुप मांडताना शालेय वेळापत्रकातील विषयांचे दहा गट तयार केले आहेत. त्यानुसार त्यांनी गट पाचमध्ये नैतिक आणि नागरिकत्वाचे शिक्षण याचा समावेश केला आहे. यात त्यांनी पुढील विषयांचा समावेश केलेला आहे.

"१] पाठ्यक्रम आणि स्वाध्याय किंवा ज्यात सर्व शिक्षक सहभागी होतील असे अप्रत्यक्ष नैतिक शिक्षण. या शिक्षणाची ध्येये पुढीलप्रमाणे -

१. सामाजिक समता व न्याय आणि जीवनाच्या नैतिक गुणवत्तेबद्दल अभिरुची यांचे संवर्धन करणे.
२. सहकार्य व सहयोग व वाढविण्यात सहाय्यक अशा नैतिक मूल्यांचा विकास करणे.
३. आक्रमकता स्वार्थ जातीयता वांशिकता इत्यादी नष्ट करणे."५

---

४. कित्ता., पान नं. १२
५. पंडित बन्सी बिहारी. "भविष्याभ्यास आणि उद्याचे शिक्षण" नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती., पृष्ठ क्रमांक ४२.

विविध शिक्षण आयोगाने अभ्यासक्रमाचा एक विषय म्हणून मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव करावा असे म्हटले होते पण असे करण्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या. बरीच कारणे त्याकरता देण्यात आली पण ते होऊ शकले नाही तरी त्याचे महत्त्व तिळमात्रही कमी झाले नाही. उलट भारतीय विचारवंतांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत मूल्यशिक्षणाची कल्पना प्रत्यक्षात अंमलात आणण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

नैतिक शिक्षणाचा अंतर्भाव अभ्यासक्रमात केल्याने ही समस्या पूर्ण सुटू शकेल काय ? नैतिक शिक्षणाच्या प्रश्नपत्रिकेत ९५ टक्के गुण मिळविण्याच्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी सर्वश्रेष्ठ नैतिक मूल्ये आम्ही संक्रमित करु शकलो काय ? याचे उत्तर होकारार्थी देणे बरेच कठीण आहे म्हणून "नैतिक शिक्षण" या ऐवजी "मूल्यशिक्षण" या विषयाकडे नवीन दृष्टीकोनातून पाहण्याची आवश्यकता आज शिक्षणतज्ज्ञांना भासत आहे. केवळ जुन्या ऐवजी नवे अशी ही दृष्टी नसून या दोन शिक्षणाच्या संकल्पनेत असलेला मूलभूत फरक समजून घेणे आवश्यक आहे.

नैतिक शिक्षण या संज्ञेपेक्षा मूल्यशिक्षण ही संज्ञा व आणि म्हणूनच ही संकल्पना अधिक व्यापक स्वरुपाची आहे. खरे तर मूल्यशिक्षण साचेबंद पद्धतीने चार भिंतीच्या आड देता येत नाही. उच्च दर्जाची नैतिक मूल्ये व जीवनमूल्ये व्यक्तीच्या ठिकाणी संक्रमित करण्याची आज नितांत आवश्यकता आहे. म्हणूनच शिक्षणाने या सर्व मूल्यांचा शोध घेऊन या सर्व मूल्यांना आपल्या शिक्षणप्रणालीत सुनियोजित पद्धतीने कसे प्रतिष्ठापित करता येईल ही शिक्षण क्षेत्रातील आजची समस्या आहे.

मूल्यशिक्षण देणे ही एका शिक्षकाची जबाबदारी नसून ती एक उच्च दर्जाची व अध्यापकीय व्यवसायाची प्रतिष्ठापना करणारी सांघिक जबाबदारी आहे. शिक्षकाची आचारसंहिता निश्चित करुन जर आचारसंहितेचे काटेकोर

पालन करणारे शिक्षक समाजाला पुरविता आले तरच मूल्यशिक्षण यशस्वी होऊ शकते. आधी केले मग सांगितले ही शिक्षणाची भूमिका याकरिता महत्त्वाची आहे. शिक्षकाबरोबर मूल्यशिक्षण यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी, पालक, समाज यांचाही सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे मूल्यशिक्षणाची संकल्पना अतिव्यापक बनते. यादृष्टीने समाजाला शिक्षित करण्याची कल्पना ही "मूल्यशिक्षण या संकल्पनेत समाविष्ट आहे.

## २.३ मूल्यशिक्षणाची व्याप्ती

शालेय शिक्षणामध्ये मूल्यशिक्षणाची संकल्पना उच्च प्रतीची आहे. त्यातून पुढील मूल्यांचा विकास साधला पाहिजे.

१] बौद्धिक मूल्ये - कुशाग्र, बुद्धिमत्ता आणि विज्ञान
२] सामाजिक मूल्ये- बंधुत्व, संघनिष्ठा, सहकार्य
३] मानसिक मूल्ये - जिज्ञासा, आवड, मानसिक क्षमता
४] व्यावसायिक मूल्ये - व्यवसायाबद्दलची निष्ठा, आवड, जबाबदारी, सचोटी
५] सांस्कृतिक मूल्ये - संस्कृतिवर्धन, प्रेम, आदर
६] अनुशासन मूल्ये - शिस्त, आज्ञापालन
७] नैतिक मूल्ये - सत्य, त्याग, नीतीमत्ता, सेवाभाव
८] धार्मिक मूल्ये - स्वधर्माचा अभिमान, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता
९] राष्ट्रीय मूल्ये - राष्ट्रीय एकात्मता, समता, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत याबद्दलची योग्य जाणीव

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२.४ मुल्यशिक्षणाची उद्दिष्टये

मुल्यशिक्षण विषय विशिष्ट उद्दिष्टानुसार असावे यात मतभेद होण्यास कारण नाही. शिक्षणातुन मुल्यनिर्मिती होतच असते तेव्हा त्यासाठी वेगळा विचार करावयाची गरज नाही. हा विचार बरोबर नाही. सर्व शिक्षण उद्दिष्टानुगामी असावे. कोणत्या मुल्यावर किती भर दयावा, इयत्ता क्रमानुसार ही उद्दिष्टये कशी असावीत याबाबत निश्चितता आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीतील परंपरागत मुल्ये आजच्या शिक्षण प्रणालीतुन दुर दुर जात आहेत. पाश्चिमात्य संस्कृतीतील जीवनमुल्ये आम्हाला अधिक महत्त्वाची वाटू लागल्याने आधुनिकीकरणाच्या नावाने बरेचसे अंधानुकरण होऊ लागले आहे.

सदाचरण, सत्य, अहिंसा, प्रेम, शांती यासारख्या शाश्वत जीवनमुल्यांची आजच्या शिक्षण पद्धतीत नव्या उद्दिष्टानुसार प्रतिस्थापना करण्याची आज नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. मार्टिन ल्युथर किंग यांच्या मताप्रमाणे देशाची खरी संपत्ती म्हणजे गुणसंपन्न नागरिक होत. मुल्यशिक्षणाची उद्दात्त उद्दिष्टये योग्य रितीने अमलात आणण्याचा प्रयत्न झाल्याशिवाय सुयोग्य नागरिक निर्माण होऊ शकणार नाहीत.

"The prosperity of a country depends not on the abundance of its revenues, nor on the strength of its fortification, nor on beauty of its public buildings but its cultivated citizens, in its men of education enlightment and character."[6] - Martin Luther King.

---

६. प्रा. ना. ग. पवार. "भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह" नुतन प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक १३९.

शालेय स्तरावर मुल्यशिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे खालील प्रमाणे सांगता येतील.

१] विद्यार्थ्यांत शिक्षणाव्दारे संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, स्त्री-पुरुष समानता, सौजन्यशीलता, सर्वधर्मसहिष्णुता, सत्य, प्रेम, करुणा, शांती वगैरे गुणांचा विकास करणे.

२] व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाची जबाबदारी पेलू शकणारे नागरिक निर्माण करणे.

३] समाजवाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही जीवनपद्धती या संकल्पनांच्याबाबत आवड जागृत करुन त्यांच्या यशस्वीतेकरता व्यक्तीची क्षमता वाढविणे.

४] देशाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे.

५] धर्म, भाषा, जात, लिंग यावर आधारित संकुचित दृष्टीकोनाला तिलांजली देण्याकरता वैचारिक जागृती करणे.

६] आत्मोन्नतीच्या प्रयत्नात प्रगती करीत राहणे.

७] स्वत:विषयी, स्वत:च्या मित्राविषयी, देशाच्या प्रगती विषयी, आंतरराष्ट्रीय सामंजस्याविषयी पर्यावरणाविषयी तसेच सर्व धर्म व संस्कृतीविषयी उदारदृष्टीकोन विकसित करणे.

८] विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करणे.

९] विज्ञान व अध्यात्म यांचे जीवनातील महत्त्व पटवून देणे

१०] प्रांतीय व आंतरराष्ट्रीय शांतता आणि सहकार्याची जाणीव निर्माण करणे.

११] स्वयंशिस्त निर्माण करणे

१२] मुल्यांचे आचरण व्हावे अशी परिस्थिती व संधी उपलब्ध करुन देणे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण [१९८६] मध्ये मूल्यशिक्षण कोणत्या उद्दिष्टानुसार देण्यात यावे याचा विचार करण्यात आला आहे तो पुढीलप्रमाणे –

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या आठव्या विभागातील ८.४, ८.५ व ८.६ च्या अंतर्गत मूल्यशिक्षणाचा विचार करण्यात आला आहे. त्यात असे नमूद केले आहे की, भारतीय जीवनाची मूल्ये टाळकत असून उच्च दर्जाची सामाजिकता व नैतिकता सांभाळण्याची जबाबदारी अभ्यासक्रमावर येऊन पडते पण हे कार्य अत्यंत व्यापक स्वरूपात असल्यामुळे केवळ वर्गखोलीतील शिक्षणावर याकरिता पूर्णपणे अवलंबून राहता येणार नाही.

The growing concern over the erosion of essential values and an increasing cynicism in society has brought to focus, the need for readjustments in the curriculum in order to make education a forceful tool for the cultivation of social and moral values (8.4). या शब्दात ही खंत व्यक्त करण्यात आली असून समाजात नैतिक मूल्यांबाबत वाढत चाललेली उपहासवृत्ती हा चिंतेचा विषय आहे. मूल्यशिक्षणातून धर्मवेड, हिंसाचार, लोकभ्रम व दैववाद नाहिसा करणे आवश्यक आहे. शिक्षणाची राष्ट्रीय उद्दिष्टे व आपला सांस्कृतिक वारसा यात मेळ घालण्याकरिता हे मोठे आव्हान स्वीकारण्याची आज नितांत गरज आहे.

मूल्यशिक्षण हे सर्वव्यापी आहे. प्रत्यक्ष विविध विषयांचे अध्ययन-अध्यापन असो, नाहीतर अभ्यासपूर्वक कार्यक्रम असोत नाहीतर शारीरिक शिक्षण, कला शिक्षण, चित्रकला, संगीत, हस्तव्यवसायाचे शिक्षण असो किंवा मूल्यशिक्षणाची स्वतंत्र तासिका असो, कोणत्याही प्रकारच्या शिक्षणात मूल्यशिक्षण सामावले

आहे, अंतर्भूत आहे. शाळेत कोणताही कार्यक्रम हाती घेताना कोणती मूल्ये त्यातून आपणास विद्यार्थ्यांत संक्रमित करावयाची आहेत याचा विचार केला पाहिजे. त्या दृष्टीने मूल्यशिक्षणाची उद्दिष्टे ध्यानात घेऊन शिक्षणविषयक कार्यक्रम कार्यान्वित करावेत.

## २.५ मूल्यशिक्षणाची आवश्यकता

मूल्यशिक्षणाची आवश्यकता आज अनेक कारणांमुळे निर्माण झाली आहे. त्यापैकी काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१] सध्या आपण अशा सामाजिक आणि राजकीय जीवनाच्या टप्प्यातून जात आहोत की ज्यावेळी दीर्घकालीन स्वीकारलेल्या जीवनमूल्यांचा ऱ्हास होत आहे. सर्व-धर्म-समभाव, समाजवाद, लोकशाही आणि व्यावसायिक नीतिमूल्ये या ध्येयावर वाढत्या प्रमाणात ताण पडतो आहे. औपचारिक शिक्षण आणि उच्च व विविध सांस्कृतिक परंपरा यात एक प्रकारची दरी निर्माण झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञानानी भारावून जाऊन आपल्या नवीन पिढया या भारताच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ठेव्यांच्या मुळापासून दूर चालल्या आहेत. हा सांस्कृतिक ऱ्हास, मानवतावादाचा ऱ्हास आणि विलगीकरणाची भावना हे कोणत्याही परिस्थितीत टाळणे आवश्यक आहे. सामाजिक आणि राष्ट्रीय विभक्तपणाच्या शक्ती लोकशाहीबद्दल समाजाची कठीण परीक्षा पाहात आहेत. लोकसंख्येच्या विस्फोटामुळे सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचा दर्जा पार घसरला आहे, त्यामुळे सामाजिक ताण व अशांतता वाढली आहे. गुन्हेगारी हिंसाचार व मानवी यातना जीवनाच्या सर्व स्तरावर पसरल्या आहेत. सामाजिक वातावरणातून पूर्वग्रह दूषित भावना आणि विकृत मने यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला आणि सामाजिक शांततेला खीळ बसत आहे, म्हणून आज मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे.

२] विज्ञानाची प्रगती, विभक्त कुटुंब पद्धती, विविध व्यसनांचे वाढते जाळे, दूरदर्शनचा वाढता प्रभाव इत्यादी अनेक कारणामुळे देखिल सामाजिक व नैतिक मुल्यांच्या ऱ्हासाला सुरवात होते. तेव्हा विद्यार्थ्यांच्या मनावर योग्य संस्कार किमान शाळेत तरी केले पाहिजेत म्हणून आज मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे.

३] आपले राष्ट्र म्हणजे काही दगडविटांनी बांधलेला किल्ला नाही किंवा आपल्याच सुखाकरिता राखून ठेवलेली भोगभूमी नाही तर मानवदेवतेच्या उपासनेकरिता आपणास प्राप्त झालेली ती एक यज्ञभूमी आहे. तेथे मानवांचे संमिलन, संस्कृतीचा समन्वय, सर्व धर्मांचे अनुष्ठान असले पाहिजे त्यासाठी मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे.

४] समाजात एकीकडे भ्रष्टाचार, अनाचार, स्वाधिनता. काळाबाजार, पाशवीवृत्ती वाढते आहे. दुसरीकडे पैशाची हाव, विध्वंसक वृत्ती, सत्तांधता वाढते आहे. दुसरी तिसरीकडे पर्यावरण असंतुलन, प्रदूषण, नैसर्गिक प्रकोप, वाढती लोकसंख्या, बेकारी, यासारखे यक्ष प्रश्न वाढत आहेत. तेव्हा बालपणापासूनच विद्यार्थ्यांवर सुसंस्कार केले पाहिजेत म्हणून आज मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे.

५] विद्यार्थी अवस्था ही जीवनातील अपरिपक्व परंतु महत्त्वाची अवस्था आहे. यावेळी स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजून घेण्याची कुवत नसते, जाणून घेऊन ते पेलण्याची हिंमत नसते. असे समजून उमजून न घेतलेले स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना तारक न ठरता मारक ठरेल यासाठी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे.

"आजच्या गतीशील आणि धकाधकीच्या जीवनामध्ये मानवी जीवन हे जीवन व्यवहारामध्ये गुरफुटलेले आहे. शाळेत अध्ययन करणारा विद्यार्थीसुद्धा त्याला अपवाद नाही. मोठ्यांच्या यांत्रिक जीवन व्यवहाराबरोबरच शालेय विद्यार्थ्यांचे शालेय जीवन यांत्रिक स्वरूपाचे झालेले आहे. अशा त-हेच्या

जीवन व्यवहाराला छेद देण्यासाठी मूल्यशिक्षण या विषयाची नितांत व अपरिहार्यपणे आवश्यकता निर्माण झाली आहे. विद्यार्थी जीवन घडत असतानाच त्या जीवनाला योग्य असे वळण मिळण्यासाठी आणि मिळालेल्या वळणानुसार भविष्यात समर्थ जीवन जगण्यास सक्षम होण्यासाठी मूल्यशिक्षण प्रत्यक्षपणे दिले जावे असा विचार करण्यात आला आहे. शालेय जीवनातील विद्यार्थ्यांचे वय अतिशय संवेदनशील असते. या वयामध्ये जशी सवय लावता येईल त्या पद्धतीने विचार करण्याची क्षमता निर्माण करता येईल. शिक्षण म्हणजे विद्यार्थी विकासाचे एक प्रभावी माध्यम आहे. शिक्षणातून केवळ शिक्षित नागरिक तयार न होता तो सुसंस्कृत आणि शहाणा नागरिक निर्माण व्हावा असे अभिप्रेत आहे. जीवनाचे हे तत्त्व विचारात घेता संवेदनशील अशा शालेय जीवनामध्येच विद्यार्थ्यांवर सुसंस्कृतपणाचे संस्कार करणे आणि त्याद्वारे शहाणपण निर्माण करणे महत्त्वाचे असते म्हणूनच महाराष्ट्र शासनाने शालेय स्तरावर मूल्यशिक्षण हा विषय अनिवार्य केला." [७]

## २.६ मूल्यशिक्षण आणि माध्यमिक शाळा

माणसाच्या मनावर संस्कार करणारी तीन प्रमुख केंद्रे आहेत – १] घर, २] शाळा ३] समाज. यापैकी घर आणि समाजात आपण ज्याप्रमाणे वागतो तीच दिशा आणि मार्गदर्शन आपणास दर्शवित असते. परंतु शाळा हे एकमेव असे संस्कार केंद्र आहे की, जेथे विद्यार्थ्यांवर जाणिवपूर्वक संस्कार करता येतात. विद्यार्थ्यांच्या दोषावर कधीच पांघरूण घातले जात नाही. माध्यमिक स्तरावरील वय हे संस्कारक्षम वय आहे, म्हणून या स्तरावर प्रत्येक विषय

---

१७. म.ज.जाधव [संपादक] "शिक्षण संक्रमण" [आक्टोबर १९९७], महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, पृष्ठ क्रमांक ३.

हा मूल्यशिक्षणाशी निगडित करून शिकविला जावा. शालेय अभ्यासक्रमातील नेहमीचे विषय हे सुप्त मूल्यांचा साठाच पुरवितात. प्रत्येक विषय हा मूल्यशिक्षणाचे साधन आहे. या शालेय विषयाशिवाय मूल्यशिक्षण प्रसंगानुरूप माध्यमिक शाळांमधून देता येईल म्हणून मूल्यशिक्षण हा विषय माध्यमिक स्तरावर अनिवार्य केला आहे.

## २.७ मूल्यशिक्षणाची आवाहने व प्रचलित शालेय अभ्यासक्रम

आजच्या शिक्षणासमोर मूल्यशिक्षणाची बरीच आवाहने आ वासून उभी आहेत. भारतीय शिक्षणातून परंपरागत पद्धतीने धार्मिक शिक्षण व नैतिक शिक्षण देण्यात येत आ होते. परंतु तशा प्रकारचे शिक्षण "मूल्यशिक्षण" या संकल्पनेत अभिप्रेत नसल्यामुळे शिक्षणक्षेत्रात या अनुषंगाने बरीच नवीन आवाहने निर्माण झाली आहेत. मानवी जीवनाची श्रेष्ठतम मूल्ये जशी प्रचलित आहेत तशीच प्रत्येक विषयाचीही मूल्ये आहेत व या सर्व मूल्यांचा साकल्याने विचार हेही एक मूल्यच आहे. शिक्षण म्हणजेच मूल्यनिर्मिती किंवा श्रेष्ठतम मूल्यांचा श्रेष्ठतम अविष्कार होय. हा आजच्या शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह होय.

मूल्यशिक्षणाचा भर मूल्यनिर्मिती करताना केवळ पाठांतर नसून ही मूल्ये प्रत्यक्षपणे रुजविण्यावर आहे. अर्थात पाठांतराद्वारे नैतिक मूल्यांचा अविष्कार ही कल्पना मूल्यशिक्षण त्याज्य मानत नाही. नैतिक, अध्यात्मिक, सामाजिक सौंदर्यात्मक व सांस्कृतिक अशा बहुविध माध्यमातून व बहुविध विषयातून ही विविध मूल्ये साकार करावयाची आहेत. त्यात सर्व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून कोणत्याही एका विशिष्ट उद्दिष्टाद्वारे मूल्यशिक्षण यशस्वी देता येणार नाही याची व्यापक जाणीव झाली पाहिजे. मूल्यशिक्षण हे मूल्याधिष्ठित शिक्षण असून त्याचे स्वरूप मूल्यांचे शिक्षण म्हणजे मूल्य निर्मितीकरता शिक्षण असे आहे.

प्रचलित शालेय अभ्यासक्रमातून मूल्यशिक्षण कसे द्यावे हे मूल्यशिक्षणासमोरील आव्हान आहे. कार्यवादी विचारवंत जॉन ड्युई प्रभृति यांच्या मताप्रमाणे मानवी जीवनाची जीवनाची मूल्ये स्थिर नसतात. ती कालमान परिस्थितीनुसार बदलतात. मूल्यकल्पना ही सापेक्ष कल्पना आहे. प्रत्येक जीवनाची वेगवेगळी मूल्ये असतात. मूल्ये स्थिर आहेत ही कल्पना मान्य केली की मनुष्याला साचेबंद जीवन जगावे लागते व त्यात मनुष्य कर्तृत्वाला फारसा अर्थ राहत नाही म्हणून मूल्यांचा शोध प्रत्येकाने आपल्या पद्धतीने आपल्याकरिता घ्यावा. पण भारतीय विचारवंतांना व विशेषत: महात्मा गांधी, रविन्द्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद या भारतीय अध्यात्मवादी विचारवंतांना ही कार्यवादी विचारवंतांची विचारसरणी मान्य नाही. भारतीय संस्कृतीने मान्य केलेली व स्वीकारलेली भारतीय जीवनाची मूल्ये शिक्षणातून निर्माण व्हावी हा भारतीय शिक्षणतज्ञांचा विचार आहे.

अशी चिरंतन शाश्वत मूल्ये शिक्षणातून निर्माण करण्याची जबाबदारी अभ्यासक्रमाची आहे. सर्व विषयाच्या अभ्यासक्रमातून कोणकोणती मूल्ये निश्चित होऊ शकतात या विचाराबरोबरच प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमातून काही विशिष्ट मूल्यनिर्मितीवरही भर देता येतो. उदाहरणार्थ नागरिकशास्त्र या विषयातून नागरिक यांना अभिप्रेत असलेली, लोकशाही जीवन पद्धतीत मान्य असलेली स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही मूल्ये साध्य करता येतात. समाजशास्त्र विषयातून सामाजिक बांधिलकीची मूल्ये निश्चित करता येतात. विज्ञान विषयातून संशोधक वृत्ती, वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवी जीवनविकासासाठी विज्ञानाचा वापर ही मूल्ये साध्य करता येतात. गणितासारख्या विषयातून तर्कनिष्ठता, अचूकता, नीटनेटकेपणा ही मूल्ये साध्य करता येतात. भूगोलासारख्या विषयातून लोकजीवन व त्यातून साकार झालेली मूल्ये मानवास लाभली आहेत. भाषा विषयाच्या बाबतीत अनेक पाठांतून राष्ट्रीय वृत्ती, सर्वधर्म समभाव, विज्ञाननिष्ठा, स्वावलंबन, प्रेम, अहिंसा, निर्भयता, सत्य इत्यादी मूल्ये व्यक्त झाली आहेत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२.८ मूल्यशिक्षण आणि पाठ्यपुस्तके

आधुनिक पाठ्यपुस्तके ही केवळ ज्ञानाची महाद्वारे नाहीत तर संस्कार आणि मूल्यांची ती कोठारे आहेत. मूल्य शिक्षणासाठी ती अत्यंत महत्वाची साधने आहेत. पाठ्यपुस्तके मग ती कोणतीही असोत त्यात पानोपानी मूल्य सामावलेली आहेत. मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकांचे संशोधन होण्याची नितांत आवश्यकता आहे.

भाषा विषय : मानवी जीवनात भाषेचा संचार सर्वत्र आहे. भाषा ही सर्वस्पर्शी सर्वगामी आहे. सुसंस्कारित जीवनासाठी भाषेच्या अभ्यासाचा उत्तम प्रकारे उपयोग होतो.

इयत्ता पहिली ते दहावीसाठी जी भाषाविषयाची पाठ्यपुस्तके तयार केली आहेत त्यात अनेक मूल्याधिष्ठित पाठ समाविष्ट आहेत. भाषाध्यापनातून भावात्मक संस्कार, चरित्रात्मक व आत्मचरित्रात्मक संस्कार विद्यार्थ्यांवर रुजविता येतात. भाषाध्यापनातून ऐक्यभाव, राष्ट्रीय एकात्मता, शांतता, सर्वधर्मसमभाव, निसर्गप्रेम, पर्यावरण शांतता, समता, आदर, अगत्य, माणुसकी इत्यादी मूल्यांचे संस्कार करणेश शक्य आहे.

सामाजिक अभ्यास : इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी विषयांचा अंतर्भाव सामाजिक शास्त्रात केला जातो. सामाजिक शास्त्राच्या अभ्यासातून मित्रप्रेम, गुरुभक्ती, प्रामाणिकपणा, अहिंसा, सत्य, पराक्रम, राष्ट्रप्रेम, त्याग, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्ये विद्यार्थ्यामध्ये रुजविता येतात. जातीयता, प्रादेशिक वाद, वंशवाद, वर्णभेद, धर्मवाद सोडविण्याकरता इतिहासाची मदत होऊ शकेल. भूगोलातून सहकार्य, सहानुभूती, सामंजस्य, परस्परावलंबन ही मूल्ये रुजविता येतात. मानवता आणि सदाचार यासारखी मूल्ये रुजविण्यास नागरिकशास्त्रासारखे दुसरे शास्त्र नाही.

गणित आणि शास्त्रांचा संस्कार : विज्ञानाची प्रगती आणि गणिताचा विकास यामुळे मानवी जीवन सुसह्य बनले आहे. गणित व शास्त्र अभ्यासातून सहानुभूती, प्राणीप्रेम, आदर, शिस्त, कृतज्ञता, एकाग्रता, शांतता वैज्ञानिक दृष्टीकोन, अचूकता, नीटनेटकेपणा, वस्तुनिष्ठपणा, चिकित्सकपणा, प्रामाणिकपणा इत्यादी मूल्ये विकसित होण्यास मदत होते. विज्ञानाच्या अभ्यासामुळे त्याज्य रुढी, अनिष्ट परंपरा आणि अंधश्रध्दा यांचे दडपण स्वीकारले जात नाही. मनमोकळेपणा, चिकित्सक विचारसरणी, अचूक निरिक्षण क्षमता, जिज्ञासूवृत्ती, वस्तुनिष्ठता, पूर्वग्रहरहित दृष्टीकोन, पुरावा महत्त्वाचा मानणे, नवीन कल्पनांचा स्वीकार, वैज्ञानिक पद्धतीचा स्वीकार इत्यादी गुणविशेष विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करता येतात.

कार्यानुभव आणि समाजसेवा : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ने समाजोपयोगी उत्पादक कार्याच्या संकल्पनेचा पुनरुच्चार केला. सहकार्य, श्रमप्रतिष्ठा, शिस्त, कार्यकुशलता, आत्मविश्वास इत्यादी मूल्यांचे संवर्धन या विषयातून चांगल्या प्रकारे होऊ शकते.

कला शिक्षण : कलेच्या आराधनेतून रसिकता व सौंदर्यदृष्टी वाढीस लागते. सर्जनशीलता वृध्दींगत होते. विचारशक्ती, संशोधनवृत्ती, रसग्रहणक्षमता निर्माण होते. राष्ट्रप्रेम व एकात्मतेची भावना जोपासली जाते. कलेच्या माध्यमातून व्यक्तिगत मूल्यांबरोबर सामाजिक मूल्यांचीही जोपासना करता येते. विद्यार्थ्यांत भूतदया, आदर, समता, समानता, बंधुता, शिस्त, सहनशीलता इत्यादी मूल्ये संक्रमित करता येतात. कलेच्या माध्यमातून होणाऱ्या आत्मविष्काराला अनन्य साधारण महत्त्व आहे.

क्रीडा क्षेत्र - क्रीडांगणावर विविध खेळ खेळत असताना अनेक मूल्ये विद्यार्थ्यांत संक्रमित होतात. खेळातून चापल्य, स्वयंशिस्त, खिलाडूवृत्ती, संघभावना, प्रयत्न, चुणचुणीतपणा, मानसिक संतुलन इत्यादी गुणांचा विकास होतो.

<u>सांस्कृतिक कार्यक्रम</u>

शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर होत असतात. पाठ्य विषय हे मूल्यसंस्काराचे औपचारिक माध्यम आहे तर सांस्कृतिक कार्यक्रम हे अनौपचारिक साधन आहे. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये पथनाट्य, प्रसंगनाट्य, कृतिसत्रे, भित्तीपत्रके, हस्तलिखिते, नाटिका, समूहगीत, नृत्य, राष्ट्रीय सण, सहली, स्पर्धा, राष्ट्रीय उत्सव, शिबिरे इत्यादी अनेक कार्यक्रमांचा समावेश असतो. सांस्कृतिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचे मनोरंजन तर होतेच पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांची मानसिक, बौद्धिक, शारीरिक आणि भावनिक विकास होण्यासही मदत होते. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या अंगी असणाऱ्या कलांचे प्रकटीकरण करता येते. त्यांच्या कलागुणांचा, सुप्तगुणांचा विकास करता येतो. तसेच विविध व्यक्तिगत आणि राष्ट्रीय मूल्ये संक्रमित करण्याचे सामर्थ्य यामध्ये दडलेले असते. याकरता विद्यार्थ्यांवर मूल्य संस्कार होण्यासाठी शाळेत नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे.

मूल्यनिर्मितीची ही जबाबदारी अभ्यासांतर्गत विषय व अभ्यासपूरक कार्यक्रमाने समर्थपणे पेलण्यास मूल्यशिक्षणाला बरीच मजल गाठता येणे शक्य आहे.

## २.९ शासनाने मूल्यशिक्षण विषयात समावेश केलेली मूल्ये

शासनाने मूल्यशिक्षण या विषयात माध्यमिक स्तरावर पुढील दहा मूल्यांचा समावेश केला आहे.

| | |
|---|---|
| १] संवेदनशीलता | ६] वैज्ञानिक दृष्टीकोन |
| २] वक्तशीरपणा | ७] सर्वधर्म सहिष्णुता |
| ३] नीटनेटकेपणा | ८] सौजन्यशीलता |
| ४] स्त्री-पुरुष समानता | ९] राष्ट्रभक्ती |
| ५] श्रमप्रतिष्ठा | १०] राष्ट्रीय एकात्मता |

## २.१० शासनाने निर्धारित केलेल्या मूल्यांची संकल्पना

१] संवेदनशीलता

संकल्पना-बाह्य जगात घडणा-या घटनांचा, प्रसंगाचा, सभोवतालच्या परिसराचा, परिस्थितीचा व सहवासात येणा-या व्यक्तीच्या वागण्याबोलण्याचा व्यक्तीच्या मनावर परिणाम होऊन घडणारी प्रतिसादात्मक कृती म्हणजेच संवेदनशीलता होय.

२] वक्तशीरपणा

संकल्पना - वेळेचे महत्त्व जाणणे, कोणतेही काम त्यानुसार वेळेवरच करणे, वेळेच्या काटेकोर पालनाने स्वतः:च्या, इतरांच्या व परिवाराच्या जीवनात सुसंवाद साधणे म्हणजेच वक्तशीरपणा होय.

३] नीटनेटकेपणा

संकल्पना - व्यक्तिचे व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक पातळीवरील सुयोग्य वर्तन, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेबाबतच्या सवयी आणि वस्तूंचा वापर त्याची निगा व सार्वजनिक सुविधांचा जागरुकतेने वापर याविषयी योग्य कृती करणे म्हणजेच नीटनेटकेपणा होय.

४] स्त्री-पुरुष समानता

स्त्री आणि पुरुष हे समान दर्जाचे आहेत त्यामुळे त्यांच्यात श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव होऊ शकत नाही. जीवनात व्यक्तिगत विकासासाठी समान संधी, समान हक्क आणि समान अधिकार प्रत्येक व्यक्तीस मिळाला पाहिजे.

५] श्रमप्रतिष्ठा

संकल्पना - कष्टाचे कोणतेही काम कमी दर्जाचे नसते. असंख्य हात सतत कष्ट करतात म्हणून आपले आयुष्य सुलभ बनते. प्रत्येकाने स्वतःहून व मनापासून काम केले पाहिजे.

६] वैज्ञानिक दृष्टी

संकल्पना - आपल्या आसपास घडणाऱ्या गोष्टींचा तर्कसंगत कार्यकारणभाव मांडणे आणि त्यानुसार योग्य कृती करणे म्हणजेच वैज्ञानिक दृष्टीकोन होय.

७] सर्वधर्मसहिष्णुता

संकल्पना - प्रत्येकाला आपल्या धर्माविषयी आस्था, आपुलकी वाटते. धर्मातील शिकवणीविषयी त्याच्या मनात आदरभाव असतो. आपल्या धर्माच्या लोकांविषयी आपलेपणा असतो. या सर्व भावभावना अन्य धर्मियांच्या बाबतीतही बाळगणे आणि समाजात वावरताना त्या उक्तिकृतीतून व्यक्त करणे म्हणजेच सर्वधर्मसहिष्णुता होय.

८] सौजन्यशीलता

संकल्पना - आपल्या आचारविचारातून, बोलण्यातून इतरांबद्दलचा आदरभाव, सद्भाव व्यक्त करणे आणि कुणालाही न दुखवता व्यवहार करणे म्हणजेच सौजन्यशीलता.

९] राष्ट्रभक्ती

संकल्पना - आपली मातृभूमी, आपल्या परंपरा, इतिहास, कला, साहित्य यांचा योग्य व सार्थ अभिमान म्हणजेच राष्ट्रभक्ती होय.

१०] राष्ट्रीय एकात्मता

संकल्पना - धर्म, वंश, भाषा, चालीरीती, आहार-विहार, कला, संस्कृती, सण, उत्सव, भौगोलिक परिस्थिती यातील वेगळेपणा असूनही

## २.११ मुल्यशिक्षणाची तासिका व तिचे नियोजन

प्राथमिक, माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक शाळांमधून, मुल्यशिक्षणासाठी वेळापत्रकातील पहिली तासिका "मुल्यशिक्षण" या विषयाच्या उपक्रमासाठी वापरावी अशी परिपत्रकाव्दारे सुचना करण्यात आली. मूल्यशिक्षणाच्या या २५ ते ३० मिनिटांच्या सुरवातीच्या दैनंदिन तासिकेला मुल्यशिक्षणाची तासिक म्हटली जाते. ही तासिका पहिली असल्यामुळे ती अधिक नाविण्यपूर्ण आणि चैतन्यमय कशी होईल याकडे आपण लक्ष देणे जरूरीचे आहे. विद्यार्थ्यांना ही तासिका आवडली तर त्या माध्यमातुन संस्कारास पोषक असे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. मुल्यशिक्षणाच्या तासिकेत विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन हवे. त्यात विविधता असली की ही तासिका कंटाळवाणी न होता आकर्षक होईल. तासिकेतील २५ ते ३० मिनिटांचे नियोजन विचारपूर्वक केलेले असावे, ते काटेकोरपणे पाळले जावे.

मुल्यशिक्षणाच्या तासिकेचे नियोजन करताना त्यात प्रार्थना, प्रतिज्ञा, सामूहिक गीत, सुविचार, सुभाषित, सुवचने, विशेषदिन, दिनविशेष, विद्यार्थ्यांशी हितगुज, संस्कारक्षम कविता, कथा, लेख, गोष्टी, ओवी, अभंग, श्लोक, साहित्यातले उतारे, कथाकथन, पुस्तक परिचय आदीसारख्या गोष्टींचा अंतर्भाव करावा. तीस मिनिटांची ही तासिका अत्यंक परिणामकारक करता आली पाहिजे. मुल्यशिक्षणाच्या तासिकेचे नियोजन कशा रीतीने केले पाहिजे याकरता उदाहरणा दाखल उपक्रमाचे नियोजन दिलेले आहे. सर्वसाधारणपणे अशा रितीने नियोजन करुन त्यात विविधता ठेवावी.

| दररोज घ्यावयाचे कार्यक्रम | अपेक्षित वेळ |
|---|---|
| राष्ट्रगीत [जन गण मन ] | दीड मिनिटे |
| राष्ट्रीय गीत [वंदेमातरम् वा अन्य देशभक्तिपर गीत] | दोन मिनिटे |
| प्रार्थना [सहा निवडून रोज एक याप्रमाणे] | ३ मिनिटे |
| प्रतिज्ञा | दोन मिनिटे |
| मनाचे श्लोक / ज्ञानेश्वरी / ओवी / अभंग/सुविचार कथन / सुवचने / साहित्यातील उतारे यापैकी | दोन मिनिटे |
| सुविचार कथन / मोठ्यांचे सुविचार | एक मिनिट |
| बातम्या / ताज्या घडामोडी | एक मिनिट |
| दिनविशेष / विशेषदिन | एक मिनिट |
| कथाकथन | तीन मिनिटे |
| पुस्तकपरिचय / व्यक्तीपरिचय / | तीन मिनिटे |
| सुभाचिंतन | एक मिनिट |
| थोरांचे मार्गदर्शन / विद्यार्थ्यांशी हितगुज | दोन मिनिटे |
| समूहगीत | दोन मिनिटे |
| परिसर स्वच्छता | पाच मिनिटे |
| मौन | दोन मिनिटे |

## २.१२ मुल्यशिक्षण मासिक नियोजनाचा नमुना [नोव्हेंबर १९९७ चा]

मुल्यशिक्षण विषयाच्या तज्ज्ञांच्या समितीने तयार केलेला मुल्यशिक्षण मासिक नियोजनाचा नोव्हेंबर १९९७ चा नमुना पुढे दिलेला आहे. हे नियोजन केवळ मार्गदर्शनाकरता दिलेले असून त्यात शाळेच्या स्थानिक पर्यावरणानुसार आवश्यक ते बदल करणे अपेक्षित आहे. हा मासिक नियोजनाचा नमुना शिक्षण संक्रमण आक्टोबर १९९७ या शैक्षणिक मासिकात दिलेला आहे, तो उदाहरणादाखल येथे दिलेला आहे.

मुल्यशिक्षण मासिक नियोजनाचा नमुना
[नोव्हेंबर १९९७]

| वार | दिनांक | सामुहिक कृती | अपेक्षित वेळ | गट कृती | अपेक्षित वेळ | वैयक्तिक कृती | अपेक्षित वेळ | मुल्य | एकुण वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| शनिवार | १.११.९७ बलि-प्रतिपदा | दिवाळी सुट्टी | - | - | - | बलिप्रतिपदा सणाची माहिती गोळा करा. शेतक-यांचे महत्त्व यावर माहिती लिहा. | ३० मिनिटे | श्रमप्रतिष्ठा | ३० मिनिटे |
| रविवार | २.११.९७ भाऊबीज | दिवाळी सुट्टी | - | - | - | बहीण व भाऊ यांच्या प्रमाच्या स्नेहसंबंधाच्या कथा कवितांच्या संग्रह करा. | ३० मिनिटे | संवेदन-शीलता | ३० मिनिटे |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सोमवार | ३. ११. ९७ | दिवाळी सुट्टी | - | - | - | दिवाळी सणातील शोभेच्या दारूमुळे अस्वच्छ झालेले घर व घराचा परिसर स्वच्छ करा. घरातील वस्तू नीटनेटक्या ठेवा. | ३०. मि. | नीटनेटके पणा श्रमप्रतिष्ठा | ३० मिनिटे |
| मंगळवार | ४. ११. ९७ | दिवाळी सुट्टी | - | - | - | लोक एकमेकांना बोलावतात व आदरतिथ्य करतात या पद्धतीची माहिती गोळा करा. | ३० मि. | सौजन्य शिलता | ३० मिनिटे |
| बुधवार | ५. ११. ९७ पांडवपंचमी ज्ञानपंचमी सरफिरोज शहा मेहता स्मृतीदिन | दिवाळी सुट्टी | - | - | - | पांडवपंचमीची माहिती गोळा करा सरफिरोजशहा मेहता यांच्या कार्याची माहिती गोळा करा. | १५ मि. १५ मि. | सौजन्य शीलता राष्ट्रीय एकात्मता | ३० मि. |



13578

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६.११.९७ गुरुवार | ६.११.९७ | दिवाळी सुट्टी | – | – | – | वक्तशीरपणा वा वेळ पाळणा-या व्यक्तींची मुलाखत घ्या व अहवाल तयार करा. | ३० मि. | वक्तशीरपणा | ३० मिनिटे |
| शुक्रवार | ७.११.९७ बलराम जयंती | दिवाळी सुट्टी | – | – | – | परप्रांतातील विद्यार्थ्यांना पत्र पाठवा व पत्रमैत्री वाढवा.<br>परप्रांतातील सत्पुरुषांची माहिती गोळा करा. | १० मि.<br>२० | राष्ट्रीय एकात्मता | ३० मिनिटे |
| शनिवार | ८.११.९७ दुर्गाष्टमी | दिवाळी सुट्टी | – | निसर्गाचा वक्तशीरपणा व मानवाचा हस्तक्षेप यावर चर्चा घडवून आणणे. | ३० मि. | निसर्गाचा नियमितपणा, वक्तशीरपणा यावर निबंध लिहा.<br>दुर्गाष्टमीची माहिती गोळा करा. | २० मि.<br>१० मि. | वक्तशीरपणा | ३० मि. |
| रविवार | ९.११.९७ महर्षि धोंडो केशव कर्वे पुण्यतिथी कुष्मांड नवमी | – | – | – | – | स्त्री शिक्षणाचे कार्य करणा-या भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांच्या बद्दलची माहिती संकलित करा. कुष्मांड नवमीची माहिती गोळा करा. | ३० मि. | स्त्री पुरुष समानता | ३० मिनिटे |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सोम-वार | १०. ११. ९७ तुलसीविवाह समारंभ कन्हैयालाल दत्त स्मृती | राष्ट्रगीत- जन गण मन अधि.. | १ | विविध वर्गातील कार्यातील विद्यार्थी मित्रांच्या सभा आयोजित करणे व राज्याच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांवर चर्चा घडवून आणणे. | ३० मि. | राष्ट्रीय नेते, थोर पुरुष, समाजसेवक यांच्या चित्रांचा संग्रह करणे व त्यांचे शालेय स्तरावर प्रदर्शन करणे. | ३० मि. | राष्ट्रीय एकात्मता | ३० मि. |
| | | मानव तिनुका एकच आहे. नीच ना कोणी उच्च न कोणी | २ | | | | | | |
| | | प्रार्थना- तमसोमा ज्योतिर्गमय | ३ | | | | | | |
| | | प्रतिज्ञा-[मराठी] | २ | | | | | | |
| | | सुविचार कथन मजहब नही सिखाता आपस मे बैर रखना हिंदुस्ता हमारा | २ | | | | | | |
| | | मौन | २ | | | | | | |
| मंगळ-वार | ११. ११. ९७ पंढरपूर यात्रा पालिख्या महायुद्धाचा शेवट | राष्ट्रगीत- | १ | — | - | वारकरी संप्रदायाची माहिती मिळणे. अन्य धर्मियांच्या संप्रदायाची माहिती मिळणे. | १० मि. | सर्वधर्म सहिष्णुता | 30 मि. |
| | | देशभक्तिपर गीत | २ | | | | | | |
| | | प्रार्थना | ३ | | | | | | |
| | | प्रतिज्ञा [गुजराथी] | २ | | | | २० मि. | संवेदनशीलता वैज्ञानिक दृष्टीकोन | |
| | | सुविचार कथन | २ | | | | | | |
| | | मौन | २ | | | | | | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बुध-<br>वार | १२.११.९७<br>सेनापती<br>बापट जन्म<br>दिन<br>पंडित मदन<br>मोहन<br>मालवीय<br>स्मृतीदिन | राष्ट्रगीत<br>देशभक्तिपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा [ हिन्दी ]<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | समूह पातळीवर<br>सौजन्यशीलतेच्या<br>कथा एकत्र<br>कराव्यात | २०<br>मि. | स्वावलंबनाचे महत्व<br>यावर निबंध लिहा.<br>सेनापती बापट<br>यांच्या कार्याची<br>माहिती मिळवा. | २०<br>मि. | राष्ट्रभक्ती<br>सौजन्य-<br>शीलता | ३०<br>मि. |
| गुरु-<br>वार | १३.११.९७<br>चतुर्दशी<br>गीतांजली<br>नोबेल<br>पुरस्कार | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना -याकुन्देन्दु<br>प्रतिज्ञा- हिंदी<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | पथनाट्याव्दारे<br>अंधश्रध्दा<br>निर्मूलनाचा<br>कार्यक्रम सादर<br>करणे. | २०<br>मि. | वैज्ञानिकांच्या<br>जीवनचरित्रातील<br>नोंदी करा. त्यांच्या<br>शोधाबाबत अधिक<br>माहिती मिळवा. | २०<br>मि. | वैज्ञानिक<br>दृष्टीकोन | ३०<br>मि. |
| शुक्र-<br>वार | १४.११.९७<br>बालदिन<br>गुरुनानक<br>जयंती<br>हजरत अली<br>जन्मदिन<br>त्रिपुरारी<br>पौर्णिमा | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | विद्यार्थ्यांशी<br>पूर्ण केलेल्या कथां-<br>वर चर्चा घडवून<br>आणणे.<br>निरनिराळ्या<br>संवेदनशील अपूर्ण<br>कथा सांगून त्या<br>पूर्ण करणे. | २०<br>मि. | त्रिपुरारी पौर्णिमा<br>माहिती गोळा<br>करा. | १५<br>मि.<br>१५<br>मि. | संवेदन<br>शीलता | ३०<br>मि. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शनि-वार | १५. ११. ९७ हुतात्मा पिंगळे स्मृती दिन. आचार्य विनोबाभावे स्मृतीदिन | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचारकथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | पवनार आश्रमास भेट देणे | ३० मि. | आचार्य विनोबा भावे यांच्या राष्ट्रीय एकात्मता या प्रार्थनेचा अर्थ समजावून देणे. | २० मि. | राष्ट्रीय एकात्मता | ३० मिनिटे |
| रवि-वार | १६. ११. ९७ | सुट्टी | – | – | – | श्रमिक व्यक्तींच्या मुलाखती घ्या व अहवाल तयार करा. मी वेळेवर आलो/ आले म्हणून निबंध लिहा. | ३० मि. | श्रमप्रतिष्ठा | ३० मिनिटे |
| सोम-वार | १७. ११. ९७ संकष्टी चतुर्थी | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | विविध धर्मातील उपवास करण्याची पद्धती व त्याचे शारीरिक व मानसिक फायदे लिहा. | ३० मि. | गणेश जयंतीची माहिती लिहा. सर्वधर्मीय प्रार्थना स्थळाची चित्रे गोळा करा व त्याचे महत्व लिहा | १५ मि.<br>१५ मि. | सर्वधर्म सहिष्णुता | ३० मिनिटे |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंगळ- | १८.११.९७ | राष्ट्रगीत | १ | – | – | – | – | राष्ट्रभक्ती | ३० मि. |
| वार | लाला | देशभक्तीपर गीत | २ | | | | | | |
| | लजपतराय | प्रार्थना | ३ | | | | | | |
| | स्मृतीदिन | प्रतिज्ञा | २ | | | | | | |
| | | सुविचार कथन | २ | | | | | | |
| | | मौन | २ | | | | | | |
| बुध- | १९.११.९७ | राष्ट्रगीत | १ | भारतातील थोर | २० | इंदिरा गांधी | २० | स्त्री पुरुष | ३० मि. |
| वार | इंदिरागांधी | देशभक्तीपर गीत | २ | महिला व | मि. | जीवन कार्याचे | मि. | समानता | |
| | जयंती रा- | प्रार्थना | ३ | त्यांचे सामाजिक | | विशेषांक संकलित | | राष्ट्रीय | |
| | ष्ट्रीय एकता | प्रतिज्ञा | २ | कार्य यावर चर्चा | | करा. | | एकात्मता | |
| | दिन महिला | सुविचार कथन | २ | घडवून आणणे | | | | | |
| | दिन | मौन | २ | | | | | | |
| | नागरिकदिन | | | | | | | | |
| गुरु- | २०.११.९७ | राष्ट्रगीत | १ | गुरुशिष्य | २० | गुरुचे प्रेम व | २० | संवेदनशीलता | ३० मि. |
| वार | गुरुपुष्यामृत | देशभक्तीपर गीत | २ | संबंधातील कथा | मि. | शिष्यांची | मि. | | |
| | | प्रार्थना | ३ | व काव्य यांचे | | निष्ठा या- | | | |
| | | प्रतिज्ञा | २ | वाचन व | | बाबतच्या | | | |
| | | सुविचार कथन | २ | सामूहिक गायन | | वचनांचा कथांचा | | | |
| | | मौन | २ | | | संग्रह करा | | | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शुक्र-वार | २१. ११. ९७ | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>२<br>३<br>२<br>२ | स्त्री-पुरुष समानता याबाबत पथनाट्ये सादर करावीत | २० मि. | सामाजिक, राज-कीय, शैक्षणिक इ. क्षेत्रामध्ये विशेष कतृत्व गाजविले-ल्या स्त्रियाबद्दल माहिती गोळा करा. | २० मि. | स्त्री-पुरुष समानता | ३० मिनिटे |
| शनि-वार | २२. ११. ९७ कालभैरव जयंती | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपरगीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | नीटनेटकेपणाचे महत्त्व लिहणे<br>नीटनेटकेपणाचे फायदे, तोटे यावर चर्चा करावी | १० मि.<br>१० मि. | असे असावे असे नसावे यावर स्व:मनाचे संकलन करा.<br>कालभैरवाची माहिती गोळा करा. | १० मि<br>१० मि. | नीटनेटके पणा | ३० मिनिटे |
| रवि-वार | २३. ११. ९७ | सुट्टी | – | – | – | राष्ट्रभक्तीपर चित्रपट पहा गुणदोषांची चर्चा करा. | ३० मि. | राष्ट्रभक्ती | ३० मिनिटे |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सोम-वार | २४. ११. ९७ | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | – | – | – | – | – | – |
| मंगळ-वार | २५. ११. ९७ | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार बं कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>१ | – | – | – | – | – | – |
| बुध-वार | २६. ११. ९७ | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | | | | | | |
| गुरु-वार | २७. ११. ९७<br>ज्ञानेश्वर<br>महाराज<br>पुण्यतिथी | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार संग्रह कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | संतज्ञानेश्वर व संतांचे<br>धार्मिक व सांस्कृतिक<br>सामाजिक कार्य या-<br>याबाबत चित्र माहिती<br>गोळा करून त्यांचे<br>प्रदर्शन भरविणे | २०<br>मि. | ज्ञानेश्वर जीवन<br>कथा व त्यांचे<br>ज्ञानेश्वरीतील<br>संवेदनशील अनुभव<br>व्यक्त करणाऱ्या<br>अभंगाचा संग्रह करा. | २०<br>मि. | संवेदनशील<br>ता सर्वधर्म<br>सहिष्णुता | ३०<br>मिनिटे |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शुक्र-<br>वार | २८<br>२८. ११. ९७<br>महात्मा फुले<br>स्मृतीदिन<br>सेनापती<br>बापट<br>स्मृतीदिन<br>शहब ए<br>मिराज | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | म. फुले यांचे स्त्री<br>शिक्षण विषयक का-<br>र्याची माहिती<br>सांगणे. म. फुले<br>यांचा पददलित,<br>हरिजन याबाबतचा<br>दृष्टीकोन स्पष्ट<br>करणे | १२<br>मि. | म. फुले व सावि-<br>त्रिबाई फुले यांच्या<br>विचाराचे संकलन<br>करा. त्यांच्या<br>सामाजिक कार्यावर<br>टिपणी करा.<br>शहब ए मिराजबद्दल<br>माहिती गोळा करा. | १०<br>मि. | संवेदनशीलता<br>स्त्री-पुरुष<br>समानता<br>राष्ट्रभक्ती | ३०<br>मि. |
| शनि-<br>वार | २९. ११. ९७ | राष्ट्रगीत<br>देशभक्तीपर गीत<br>प्रार्थना<br>प्रतिज्ञा<br>सुविचार कथन<br>मौन | १<br>२<br>३<br>२<br>२<br>२ | वर्गनिहाय विविध<br>धर्मातील संतांचे<br>कार्य त्यांच्या सु-<br>विचारांचे संकलन<br>महत्त्वाच्या परंपरा<br>याबाबत माहिती<br>सांगणे. | २०<br>मि. | – | – | सर्वधर्म<br>सहिष्णुता | ३०<br>मिनिटे |
| रवि-<br>वार | ३०. ११. ९७ | सुट्टी | – | – | – | पेडग्याच्या शेंगा<br>अश्रूंची झाली फुले<br>मानिनी, मोलकरीन<br>श्यामची आई इ.<br>चित्रपट पहा.<br>गुणदोष चर्चा करा. | ३०<br>मि. | संवेदनशीलता | ३०<br>मि. |

२.१३ मुल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका

मूल्यांचे संक्रमण करण्यासाठी शिक्षकांना महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागेल. आपले शिक्षक विद्यार्थ्यांना आदर्श वाटत असतात याकरिता शिक्षकाने स्वत:चे आत्मपरिक्षण करावे. याकरता शिक्षकाने वक्तशीर असले पाहिजे. प्रयोगशील, कृतिशील असावे, नवनवीन उपक्रमाच्या शोधात असावे. सर्वांशी उदारपणे व न्यायबुद्धिने वागले पाहिजे. मूल्यशिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न शिक्षकांनी केला पाहिजे. विद्यार्थ्यांवर मूल्यशिक्षण होण्याकरता शाळेत नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. "शाळेतील शिक्षकांनी मूल्यशिक्षणाचा ध्यास घ्यावयास हवा. शिक्षक विचार करतील तर उपक्रम आणि प्रकल्पात नावीन्य राहील. कोणताही कार्यक्रम हाती घेताना यातून विद्यार्थ्यात कोणती मूल्ये संवर्धित होतील याचा सूक्ष्मपणे विचार शिक्षकांनी केला पाहिजे." [८]

मुल्यशिक्षण करण्याची जबाबदारी शिक्षकांची अधिक आहे. कारण विद्यार्थी शिक्षकांच्या सहवासात अधिक काळ असतात. शिक्षकांचा विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संबंध येतो. शिक्षकांचे निरिक्षण व अनुकरण विद्यार्थी सतत करीत असतात. आपल्या शिक्षकांवर विद्यार्थ्यांचा संपूर्ण विश्वास असतो. शिक्षक हे विद्यार्थ्यांचे आदर्श असतात. याकरता शिक्षकाचे वर्तन नियंत्रित असले पाहिजे. शिक्षकांनी सतत नवोपक्रमांचा शोध घेतला पाहिजे. उपक्रमांची रेखीव आखणी करून अंमलबजावणी करावी.

---

८. सुरेश करंदीकर "मूल्यशिक्षण", फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती पृष्ठ क्रमांक ५२.

प्रत्येक विषय शिकवितांना कोणते मूल्य संस्कारित करावयाचे आहे याचा शोध शिक्षकास घ्यावा लागेल. त्यासाठी कोणत्या अध्ययन अनुभूती द्याव्यात हे ठरवावे लागेल. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या वर्तनाचा अत्यंत सूक्ष्मपणे आणि सहानुभूतीपूर्वक अभ्यास केला पाहिजे. आपल्या विद्यार्थ्यांना त्याने नैतिक गुणांचा परिचय स्वत:च्या वर्तनातून सहजपणे करुन दिला पाहिजे. नैतिक आचरण हे कष्टदायी असले तरी ते निष्ठेने करावयास हवे ही गोष्ट शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवली पाहिजे. विद्यार्थ्यांकडून घडणा-या चांगल्या आचरणाची दखल घेऊन त्याबाबतीत विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहित केले पाहिजे. मूल्ये विद्यार्थ्यात रुजावीत म्हणून स्वत:च्या वर्तनाची छाप शिक्षकांनी उमटविली पाहिजे. त्याबरोबर ती मूल्ये विविध माध्यमांचा उपयोग करुन अत्यंत प्रभावीपणे विद्यार्थ्यांसमोर मांडली पाहिजेत. प्रसंगी अनुभव कथन करुन, समाजातील उदाहरणे देऊन, दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन, कथाकथन करुन, उत्तम निवेदन, व्याख्यान, चर्चा इत्यादी माध्यमांद्वारे मूल्ये विद्यार्थ्यांना पटवून द्यावीत. मूल्यासंबंधी विद्यार्थ्यांकडून अपेक्षित वर्तन कोणते आहे याचेही चिंतन शिक्षकांना सतत करावयास हवे.

मूल्यशिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षकाची भूमिका सेनापतीची आहे. या बालजगतात शिक्षकांचा शब्द आणि अक्षर प्रमाण मानले जाणार आहे. याकरता या विषयाच्या संदर्भात शिक्षकांनी पुढील किमान तत्वे पाळली पाहिजेत.

१] हजार विचारांपेक्षा एक आचार महत्त्वाचा असतो. आचार हेच प्रचाराचे मुख्य साधन आहे. त्यामुळे शिक्षकांचे आचार, विचार व कृती यात एकरूपता असावी.

२) शिक्षकाने शाळेत प्रेमाचे, विश्वासाचे आणि सुरक्षिततेचे वातावरण निर्माण केले पाहिजे. आपले विद्यार्थी ह भयमुक्त असावेत. असुरक्षित भावनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आक्रमकता येण्याची शक्यता असते. यासाठी त्याच्यावर दडपण येणार नाही असे वागा.

३) विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाचा टप्पा विचारात घेऊन योग्य ती अध्यापन पध्दती वापरावी.

४) मुल्यशिक्षण प्रत्यक्ष परिस्थितीशी जोडून दाखविणे, प्रसंगानुरूप उपदेश करावे. बालकांना अनुभवातून शिकू द्यावे.

५) शिक्षकाने स्वत:शी व स्वत:च्या व्यवसायाशी प्रामाणिक राहिले पाहिजे.

शिक्षकाच्या सारथ्य नैपुण्यावरच मुल्यशिक्षणाचा रथ अवलंबून आहे. "मुल्यशिक्षण" ही काळाची गरज आहे. त्याला दुसरा पर्याय नाही.